कालमर्यादा
महत्त्वाचे

क्र.पोमसं/३/१०/६/सार्वत्रिक बदल्या-१५/५७८/२०१४
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-०१
दिनांक:-२९/१२/२०१४.

**परिपत्रकः-**

संदर्भः- महाराष्ट्र पोलीस (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम-२०१४.

विषयः- सार्वत्रिक बदल्या-२०१५:
पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक.

-------o-------

पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस निरीक्षक यांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबत खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे:-

१) पोलीस उप निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक यांचा एका पोलीस ठाण्यातील / एका ठिकाणचा कालावधी प्रचलित नियमानुसार (महाराष्ट्र पोलीस कायदा) ०२ वर्षांचा राहील.

२) पोलीस उपनिरीक्षक सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक यांचा, त्यांच्या आयुक्तालयातील एकूण कालावधी ०६ वर्षांचा (बृहन्मुंबई आयुक्तालयासाठी ०९ वर्षांचा) व जिल्ह्यातील ०६ वर्षांचा आणि परिक्षेत्रातील एकूण कालावधी ०९ वर्षांचा पूर्ण झाला असेल व त्यांना दिनांक ३१/०५/२०१५ पर्यंत किंवा त्यापूर्वी सध्याच्या पदावर ०२ वर्षे पूर्ण होत असतील किंवा झाली असतील तर, त्याच पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षकांची माहिती त्यांच्या बदलीच्या विनंतीसह या कार्यालयास पाठवावी. जेणेकरुन ह्या कार्यालयातील पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ च्या शिफारशीनुसार त्यांच्या आयुक्तालयाबाहेर, जिल्ह्याबाहेर किंवा परिक्षेत्राबाहेर बदल्या करण्यात येतील.

३) ज्या पोलीस अधिकाऱ्यांचा आयुक्तालयांतर्गत / जिल्ह्यांतर्गत एका ठिकाणचा ०२ वर्षांचा कालावधी दिनांक ३१/०५/२०१५ पर्यंत किंवा त्यापूर्वी पूर्ण होत असला परंतु, त्यांचा आयुक्तालयात ०६ वर्षे (बृहन्मुंबई आयुक्तालयासाठी ०९ वर्षे), जिल्ह्यात ०६ वर्षे व परिक्षेत्रात ०९ वर्षांचा कालावधी पूर्ण होत नसल्यास त्या अधिकाऱ्यांच्या संदर्भाधिन अधिनियमातील तरतुदींनुसार आयुक्तालयांतर्गत, जिल्ह्यांतर्गत व परिक्षेत्रांतर्गत बदल्या या संबंधीत पोलीस आयुक्त व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या अधिपत्याखालील पोलीस आस्थापना मंडळाच्या मान्यतेने करण्यात येतील.

४) त्याचप्रमाणे सर्व विशेष शाखा जसे गुअवि, रागुवि, ॲसीबी, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मपोअ, मगुप्र, दविप, डीटीएस, फोर्स वन, विसुवि, बीडीडीएस, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय इत्यादी ठिकाणी दिनांक ३१/०५/२०१५ पर्यंत किंवा त्यापूर्वी ०२ वर्षे पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांची माहिती त्यांच्या बदलीच्या विनंतीसह या कार्यालयास पाठवावी. तथापि, त्यांच्या विनंत्या व उपलब्ध रिक्त पदे विचारात घेऊन प्रशासकीय सोयीनुसार त्यांच्या बदल्या ह्या कार्यालयातील पोलीस आस्थापना मंडळाच्या मान्यतेने करण्यात येतील.

५) त्याचप्रमाणे, विहीत कालावधी पूर्ण झालेला नसतांना सध्याच्या ठिकाणाहून इतर ठिकाणी बदली करण्यासाठी विनंती केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची माहिती त्यांच्या विनंतीच्या ठिकाणांसह या कार्यालयास दिनांक १५/०२/२०१५ पर्यंत पाठवावी. तसेच, सर्व घटक प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील पोलीस अधिकाऱ्यांना लेखी स्वरुपात स्पष्ट सूचना द्याव्यात की, १) त्यांनी त्यांच्या बदली संदर्भात वारंवार विनंती अर्ज न करता एकाच अर्जात त्यांची जी काही विनंतीची ठिकाणे

असतील ती नमूद करुन सदरचा अर्ज योग्य त्या मार्फतीनेच दिनांक १५/०२/२०१५ पर्यंत या कार्यालयास पाठवावा. २) पोलीस अधिकाऱ्यांनी या कार्यालयास सादर केलेल्या / करण्यात येणाऱ्या विनंती अर्जांच्या आगाऊ प्रतींची संख्या ही शेकडो असल्याने अशा प्रकारे या कार्यालयास मोठ्या प्रमाणावर प्राप्त होणाऱ्या प्रत्येक आगाऊ प्रतींवर या कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करणे शक्य होणार नाही. त्याचप्रमाणे, काही पोलीस अधिकारी अशा आगाऊ प्रतींचा संदर्भ, त्यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे सादर केलेल्या मूळ अर्ज प्रकरणात नमूद करुन सदर आगाऊ प्रतींवर / संदर्भांवर या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत मा.न्यायाधिकरणामार्फत विचारणा करतात. त्यामुळे योग्य मार्फतीने प्राप्त झालेल्या संदर्भाव्यतिरीक्त आगाऊ प्रतींवर कार्यवाही करणे, अथवा त्याबाबतचे स्पष्टीकरण या कार्यालयाकडून देणे संयुक्तीक होणार नाही. ३) तसेच, जर पोलीस अधिकाऱ्यांना या कार्यालयात मा.पोलीस महासंचालक, अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) व विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) यांना प्रत्यक्ष विनंती अर्ज सादर करणे अगदीच आवश्यक असल्यास अशा पोलीस अधिकाऱ्यांनी प्रथम त्यांच्या अर्जावर संबंधीत घटकप्रमुखांचे अभिप्राय / मत घेणे आवश्यक असेल, आणि ते पोलीस दलाच्या शिस्तीस अनुसरुन योग्य होईल.

६) सार्वत्रिक बदल्या या एप्रिल-मे या महिन्यामध्ये करणे नियमान्वये आवश्यक आहे. त्याकरीता सर्व संबंधीत घटकांकडून प्राप्त झालेल्या माहितीची छाननी, तपासणी करुन त्याचे संगणकावर योग्य प्रकारे संकलन करुन त्यांनंतर पुनः तपासून ती पोलीस आस्थापना मंडळासमोर सादर केली जाते. या सर्व कामकाजासाठी अंदाजे दोन महिन्यांचा कालावधी आवश्यक आहे. त्यामुळे सर्व घटकप्रमुखांनी परिच्छेद-१ मधील मुद्दे क्र.१ ते ५ बाबतची त्यांच्या घटकाची माहिती विहीत वेळेत म्हणजे दिनांक १५/०२/२०१५ पूर्वी न चुकता पाठवावी. यामध्ये कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याची माहिती पाठवावयाचे नजर चुकीने राहून गेले इत्यादि बाबी संयुक्तीक नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

२. तरी सर्व घटकप्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त **१ ते ६** मुद्यांमध्ये नमूद केल्याप्रमाणे पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक यांच्या स्वतंत्र याद्या व संपूर्ण सेवातपशील इत्यादि माहिती (पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षक या तिनही संवर्गासाठी) **स्वतंत्र तीन पत्रे तयार करुन ती दिनांक १५/०२/२०१५ पूर्वी निश्चितपणे पोहोचतील** अशाप्रकारे (कार्यासन क्रमांक ३, ४ व ५) ह्या कार्यालयास खास दुतामार्फत पाठवावीत. त्यानंतर आवश्यकतेनुसार पोलीस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या करण्याबाबत पोलीस आयुक्त / विशेष पोलीस महानिरीक्षक यांना सूचना देण्यात येतील व ज्या अधिकाऱ्यांच्या बदल्या ह्या कार्यालयाकडून करणे आवश्यक आहे त्यांच्या बदल्यांबाबतचे आदेश ह्या कार्यालयाकडून निर्गमीत करण्यात येतील.

३. घटक प्रमुखांनी सदरची माहिती *Hard copy* आणि *Soft copy* मध्ये मराठी (*DVB-TTSurekh*) किंवा इंग्रजी (*Times New Roman*) या फॉंट (Font) मध्ये, तसेच सदर परिपत्रकासोबत जोडलेल्या सेवातपशिलाच्या नमुन्याप्रमाणेच योग्य रकान्यात योग्य माहिती नमूद करुन संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांच्या अद्ययावत व बिनचूक सेवातपशिलांची विवरणपत्रे ही *A४ size* पेपरवर "प्रत्येकी एक" याप्रमाणे पाठवावीत. अन्य फॉंट (*Font*) मध्ये प्राप्त झालेली माहिती ह्या कार्यालयातील संगणकावर अन्य फॉंट (*Font*) उपलब्ध नसल्याने ती भरण्यासाठी अधिक कालावधी लागण्याची शक्यता असल्याने, अशी माहिती स्विकारणे शक्य होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

४. सर्व घटकप्रमुखांनी प्रस्तुत बाबींकडे कृपया वैयक्तीक लक्ष पुरवावे.

५. सर्व घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, पोलीस अधिकाऱ्यांच्या सार्वत्रिक बदल्या-२०१५ बाबतची माहिती ह्या कार्यालयास सादर करताना सदरची माहिती ह्या कार्यालयातील नोंदणी शाखेत न देता ती **थेट कार्यासन**

**क्रमांक ३, ४ व ५ मध्येच देण्याबाबत.** तसेच सदरची माहिती संबंधीत कार्यासनात प्राप्त झाल्याबाबतची खात्रीदेखील करण्याबाबतच्या सूचना संबंधीत लिपीक व टपाल ड्युटीवरील कर्मचाऱ्यांना द्याव्यात.

सहपत्रः- १

**( अतुलचंद्र कुलकर्णी )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरीता.

प्रति,

महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई. (सस्नेह अग्रेषित )
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा., पुणे.
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई / लोहमार्ग, मुंबई / वाहतूक, मुंबई / ना.ह.सं., मुंबई / द.वि.प., म.रा., मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबई सह व बृहन्मुंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक/नक्षल विरोधी अभियान, नागपूर/ व्हीआयपी-सुरक्षा, दादर-मुंबई/फोर्स वन, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / विसुवि, दादर / राज्य पोलीस नियंत्रण कक्ष सह)
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये / युओटीसी, नागपूर /डीटीएस, नाशिक.

**प्रत योग्य त्या कार्यवाहीकरिता सस्नेह अग्रेषित.**

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८ क्वीस गार्डन, पुणे.
संचालक, समाजकल्याण संचालनालय, म.रा.,पुणे / संचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे-१.
उपायुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे / पुणे / नाशिक /औरंगाबाद / नागपूर / अमरावती / नंदुरबार / गडचिरोली.
उप संचालक, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, कोंकण विभाग, नवी मुंबई / मुंबई शहर, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / कोल्हापूर / धुळे / सोलापूर / नागपूर / अमरावती / अकोला / लातूर / चंद्रपूर.

२. त्यांनी, त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत पोलीस अधिकाऱ्यांची माहिती संकलित करुन ती या कार्यालयास विहीत मुदतीमध्ये पाठवावी, ही विनंती.

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई.

२. सदरचे परिपत्रक _http://www.mahapolice.gov.in_ या संकेतस्थळावर **FLASH** या शिर्षाखाली सत्वर प्रसिद्ध करावे.

प्रत,

कार्यासन अधिकारी, का.क्र.४, ५, ३६ व ४० (पोमसं कार्यालय).

## नमुना-विवरणपत्र

### पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या-२०१५.

| अ.क्र. | पोउपनि / सपोनि / पोलीस निरीक्षकाचे नाव सध्याची नेमणूक मूळ जिल्हा / सेवानिवृत्ती दिनांक | खात्यात अंमल दिल्यापासून कार्यकारी व अकार्यकारी पदात केलेली एकुण सेवा | खात्यात अंमल दिल्यापासून अकार्यकारी पदात केलेली सेवा | विनंती अर्ज किंवा शिफारस असल्यास |
|---|---|---|---|---|
| | नाव- अ ब क<br><br>सने-दि.२६/०५/१० पासून सांगली<br><br>दि. ०१/०६/११ पासून विश्रामबाग पोलीस ठाणे<br><br>मूजि- पुणे ग्रामीण<br><br>सेनि- ३०/११/२०१७ | **पोउनि**<br>०१/०६/८८ ते १५/०८/९१ मुंबई शहर<br>३०/०८/९१ ते ०७/०२/९४ विसुवि पुणे<br>१०/०२/९४ ते १५/१२/९८ पुणे शहर<br>३१/१२/९८ ते २५/०५/९९ लोहमार्ग मुंबई<br>**सपोनि**<br>३०/०५/९९ ते १२/०५/०० मुंबई शहर<br>१५/०५/०० ते २०/०५/०३ कोल्हापूर<br>**पोनि**<br>२१/०५/०३ ते १७/०९/०४ कोल्हापूर<br>२४/१०/०४ ते १०/०५/०६ मुंबई शहर<br>१५/०५/०६ ते २०/०५/०७ रागुवि<br>३०/०५/०७ ते २५/०५/१०<br>टीआरटीआय पुणे<br>२६/०५/१० ते आजपावेतो सांगली | ३०/०८/९१ ते ०७/०२/९४<br>विसुवि पुणे<br><br>१५/०५/०६ ते २०/०५/०७<br>रागुवि<br><br>**अकार्यकारी पदात**<br>**एकूण सेवा**<br>**०२ वर्षे ०६ महिने** | **विनंतीचे ठिकाण-**<br>गुअवि / पोप्रवि खंडाळा /<br>नानवीज / एमआयए पुणे / विसुवि पुणे / पोप्रवि सांगली<br><br>मला पाहिजे असलेल्या बदली / नेमणूकीबाबत या अर्जाव्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तीकडे संदर्भ / विनंती केली नाही. अशी विनंती अन्य कोणाही मार्फत प्राप्त झाल्यास तिचा माझ्याशी संबंध नाही. व त्याचा विचार करण्यात येवू नये. तसेच विनंती केलेल्या जागी बदली मिळणे हा माझा अधिकार नसून प्रशासकीय सोयीनुसार व उपलब्ध रिक्त पदांची स्थिती विचारात घेवून माझ्या बदलीचा विचार केला जाईल ही बाब मला मान्य आहे.<br><br>(अर्जदाराची स्वाक्षरी) |

**(घटकप्रमुखांची स्वाक्षरी)**